MUCLA Newsletter Bilingual
Maharashtra University And College Librarians Association
Regd. Under Trade Union Act.1926 Regd No:n.s.k./J-1835, Dt. 03/ 05/ 02014

Vol. 1, Issue 2 MUCLA Newsletter January-March 2021

---

## New Technology in Libraries

---

### ज्ञानसागर ब्लॉग

गजानन प्र. खिस्ते, माहिती शास्त्रज्ञ, ज्ञान स्त्रोत केंद्र,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
Email- khistegajanan@gmail.com

'ज्ञानसागर' (https://www.dnyansagar.in/) या ब्लॉगची सुरवात दिनांक २२/५/२०२० रोजी गजानन प्र. खिस्ते यांनी केली असून या ब्लॉगच्या माध्यमातून उपयुक्त बेवसाईटस, महापुरुष, विविध संत, सण–उत्सव व इतर माहिती ई–बुक्स, ऑडीओ ई–बुक्स्, पीएच.डी. प्रबंध, चित्रपट, वेबसाईटस स्वरुपात वाचक–संशोधकांना संकलित करुन देण्यात येत आहे. या ब्लॉगचा मुख्य उद्देश इंटरनेटवरील विविध विषयावरील साहित्य एकत्रित रित्या संकलित करुन वाचकांस उपलब्ध करुन देणे व ई–साहित्याबद्दल जागरुकता निर्माण करणे हा आहे. आजपर्यंत या ब्लॉग वर एकूण ९७ पोस्ट प्रकाशित झालेल्या असून विविध देशातील एकूण २९२६१ वाचकांनी या ब्लॉगला भेट दिलेली आहे. यामध्ये भारत २८६००, अमेरिका ३००, रोमानिया ८१, अननोनरिजन ४४, इंडोनेशिया ४०, रशिया २४, जर्मनी २१, युनायटेड किंगडम १९, सौदी अरेबिया १८, युनायटेड अरबएमरटस १०, आयर्लंड ८, ब्राझील ७, व्हिएतनाम ७, फ्रांस ५, सिजेचीया ४, जापान ४, नेदरलँड्स ४, ऑस्ट्रेलिया ३, बेल्जियम ३, इतर ५० देशातील वाचकांचा तसेच अभ्यासकांचा समावेश आहे.

या ब्लॉगमधील सर्व पोस्ट https://www.dnyansagar.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे तसेच या ब्लॉगच्या (https://www.dnyansagar.in/p/sitemap_40.htmlया लींकवर क्लिक केल्यास सर्व पोस्ट केव्हाही अभ्यासकांना पाहता येतात. या ब्लॉगवर वाचकांसाठी खालील विषयावर माहिती उपलब्ध आहे. श्री जेष्ठागौरी, श्रीकृष्णा, श्रीगणेश, पंढरपूर यात्रा, गुरुपूर्णिमा, श्रीचक्रधरस्वामी, संत ज्ञानेश्वर, संत सावतामाळी, संत नरहरी सोनार, संत सेना महाराज, संत नामदेव, संत तुलसीदास, श्रीरामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, मदर टेरेसा, रक्षाबंधन माहिती, मैत्री, बकरी ईद, भारतीय स्वातंत्र्य, आदिवासी दिन, बैलपोळा, कारगिल विजय दिवस, नागपंचमी विषयी निवडक माहिती, राजमाता जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, महाराज रणजीतसिंह, राजर्षी शाहू महाराज, सुनीता पुरुषोत्तम देशपांडे, पंडित धर्मानंद को संत हरिशंकर परसाई, महाकवी कालिदास, पक्षी निरीक्षक सलीम अली, स्वातंत्र्यवीर सावरकर, आचार्य प्र.के.अत्रे, पु.ल.देशपांडे, साने गुरुजी, लोकप्रभा साप्ताहिक, लहान मुलांसाठी निवडक ई–रिसोर्सेस, मराठी वृत्तपत्रे वेबसाईटस, काव्यालय– हिंदी कवितांचा अप्रतिम खजिना, पाककृती/रेसीपी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ वेबसाईट, क्रांतिकारी चंद्रशेखर आझाद, क्रांतिकारी शिवरामहरी राजगुरु, क्रांतिसिंह नाना पाटील, लोकमान्य टिळक, समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर, डॉ. शियाली रामामृत रंगनाथन, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, साहित्य रत्न अण्णाभाऊसाठे, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, वसंतराव नाईक, अटलबिहारी वाजपेयी, विलासराव देशमुख, गोपनाथ मुंडे, तसेच इंग्रजी, विधी, सांख्यिकी, योगा व समाजकार्य विषयाशी संबंधित ई–रिसोर्सेस, योगाशी संबंधित माहिती इत्यादी. तसेच वेळोवेळी नवनवीन विषयावरील संकलन अपलोड करण्याचा प्रयत्न चालू आहे. अभ्यासकांनी या स्तोत्राचा उपयोग नवीन साहित्य निर्मितीसाठी करावयासाठी हा प्रयत्न आहे. तसेच अनमोल असा साहित्याचा ठेवा वाचकांना आणखी या स्वरुपात उपलब्ध करुन देणे हा आहे.